**प्रशासकिय ईमारत जिल्हा परिषद, वाशिम**
**आयएसओ ९००१:२००८ मानांकित कार्यालय**
**जिल्हाधिकारी कार्यालय समोर वाशिम ४४४ ५०५**

**दुरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२८६२** **फॅक्स :- ०७२५२-२३३६९८**
**ईमेल आयडी :- dyceozpwashim@gmail.com**

---

**शासकिय / निमशासकिय कार्यालयासह सार्वजनीक ठिकाणी थुंकणे / धुम्रपान करणे असे कृत्य करुन कलमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कार्यवाही करणे बाबत.**

# परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ ८23 /२०१८
दिनांक २२ फेब्रुवारी २०१८

**संदर्भ :-**१) केद्र शासनाच्या सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध,व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण ) कायदा २००३

२) सार्वजनीक आरोग्य विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक तंबाखू २०१४/प्र.क्र.१५९/ आरोग्य -५ दिनांक १६ जुलै २०१४

**उपरोक्त** केद्र शासनाचे कायदा २००३ च्या तरतुदीत व शासनाचे आरोग्य विभागाचे शासन परिपत्रकातील तरतुदीचे अनुषंगाने सार्वजनीक ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध आहे. लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट ,सुगंधित तंबाखू ,स्वादिष्ट,सुगंधित सुपारी यांची निर्मीती, साठवण वितरण किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

सार्वजनीक ठिकाणी धुम्रपानावर आणि थुंकण्यावर,वरील अधिनियमान्वये प्रतिबंध असला तरी सार्वजनीक ठिकाणी थुंकण्याचे आणि धुम्रपान करण्याचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. थुंकण्यामध्ये सार्वजनीक मालमत्ता विद्रुप होते. तसेच नागकरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. उपरोक्त अधिनियमातील कलम २१ तरतुदीनुसार सार्वजनीक ठिकाणी धुम्रपान करणा-या व्यक्तीस रुपये २००/- प्रमाणे दंडात्मक कार्यवाहीची तरतुद आहे.

वरिल अधिनियमातील व शासन परिपत्रकातील तरतुदीचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने वाशिम जिल्हा परिषद मुख्यालय/ कार्यालय सर्व पंचायत समिती कार्यालये व अधिनस्त असलेले विभाग या ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध असुन या कायदयातील तरतूदीचे उल्लंघन करणा-या कोणत्याही कर्मचारी/व्यक्तीवर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल. हे परिपत्रक सर्व कर्मचा-यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे. तसेच प्रत्येक कार्यालयाचे दर्शनी भागात सार्वजनीक ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध आहे. उल्लंघन केल्यास रुपये २००/- ची दंडात्मक कार्यवाही केली जाईल असे नोटीस बोर्ड लावण्यात यावे.

यापुढे वरील अधिनियमातील तरतूदीचे व परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास सबंधिता विरुध्द कलमातील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही सबंधित विभागाचे कार्यालय प्रमुख / खाते प्रमुख यांनी करावी.

(दीपक कुमार मीना) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

प्रति,

१. मा.अध्यक्षा,मा.उपाध्यक्ष जि.प.वाशिम यांना माहिती करिता सविनय सादर.
२. मा.सभापती ---------------------- समिती जि.प.वाशिम यांना माहिती करिता सविनय सादर.
३. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प.वाशिम यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
४. खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - - - - - - - - (सर्व)

(दीपक कुमार मीना) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम